**अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.**

# शास्त्रीबुवांशीं संवाद

—काय, शास्त्रीबुवा? तुम्ही नागपूरला गेलां होतां म्हणे?

—हो, कालच आलों परत.

—मग तुम्ही त्या नागरिक चर्चेला गेलां होतां की नाही?

—छे, हो! मी काय म्हणून जाईन? अगोदर धर्मशास्त्रासारखा विषय, त्यांत सामान्य नागरिकांना काय कळतें आहे? समजा ते सुशिक्षित होते, पण हल्लीच्या सुशिक्षितांना काय धर्मशास्त्र कळतें होय? ते चर्चा काय करणार आणि आहे काय? तो आमचा विषय आहे, त्यांत इतरे जनांना काय कळणार? आणि तें सिद्धच झालें तेथे. प्रमुख वक्त्यांनीच सांगितलें की मला धर्मशास्त्रांत कांही कळत नाही म्हणून. मग आले कशाला धर्मशास्त्रावर चर्चा करायला? समजा उद्यां रसायनशास्त्रासंबंधी चर्चा असली, तर तेथे माझ्यासारखा मनुष्य जाऊन काय बोलूं शकेल?

—पण शास्त्रीबुवा, धर्मशास्त्र हा कांही रसायनशास्त्रासारखा विषय नव्हे. रसायनशास्त्रांत जें कांही सत्य असेल तें सगळें प्रयोगांवरुन ठरतें. धर्मशास्त्राचें कांही तसें नाही. समाजहित कशांत आहे आणि कशांत नाही, हें सुशिक्षित माणसांना चर्चायला काय हरकत आहे?

—येथेच तर तुम्ही चुकतां आहांत. धर्मशास्त्रांत समाजहिताचा प्रश्नच येत नाही, निदान त्याची चर्चा येत नाही. धर्मशास्त्र हें प्राचीन ऋषींनी एकदां ठरवलेलें आहे. त्यांना काय समाजहित कळत नव्हतें? श्रींनी नंतर निर्णय

देतांना सांगितलेंच की नाही, की तरुण मुलीचा पति मेला तर वाईट कोणाला वाटत नाही ? सर्वांनाच वाटतें. पण त्याला करणार काय ? त्याला कांही उपाय नाही. या गोष्टी दैवाधीन असतात. मागल्या जन्मींच्या पापपुण्याचीं फळें असतात तीं. तीं ज्याचीं त्याने भोगलींच पाहिजेत. तीं टाळूं म्हणतां टळणार नाहीत. तिच्या नशिबीं जर वैधव्य असलें आणि तिनें पुनर्विवाह केला, तरी तो दुसरा नवरा मरेल, तिसरा केला तर तिसरा मरेल. मीं असें उदाहरण प्रत्यक्ष पाहिलेलें आहे.

—काय सांगतां शास्त्रीबुवा ? म्हणजे तुमचें म्हणणें असें की बायकोच्या नशिबीं वैधव्य लिहिलेलें आहे म्हणून नवरा मरतो ? त्याच्या पापपुण्याचा त्यांत कांही संबंध नाही ?

—अहो तो असतोच ना ! नाही असें कसें होईल ? पण तिच्या नशिबीं जर वैधव्य असलें तर तिचें लग्न पुनः अशाच माणसाशीं होईल की त्याला फार आयुष्य शिल्लक नसेल. तिसऱ्यांदा केलें तरी पुनः तसेंच. तें कांही विचारूं नका. यंत्राचीं चाकें जशीं एकमेकांत गुंतलेलीं असतात ना, तशी ती सांगड जुळलेली असते.

--पण शास्त्रीबुवा, तरमग तिचा पुनर्विवाह व्हायचा की नाही हें सुद्धां तिच्या नशिबांत लिहिलेलें असेल नाही का ? म्हणजे तिने नाही म्हटलें तरी तो होणारच. त्यांत तिचा कांही अपराध नाही. असें नाही का ?

--हो हो, तें तर ठरलेलेंच. नशिब म्हणजे काय, पूर्वजन्मींचें संचित. त्यावर सगळें अवलंबून असतें.

--मग शंकराचार्यांनी मागून जो निर्णय दिला की पुनर्विवाह म्हणजे व्यभिचार आहे, त्याचा अर्थ काय ?

--तें अगदी सरळ आहे. स्त्रीला पति एकच असायचा असें शास्त्र आहे. त्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि पुरुषाशीं तिचा संबंध झाला की तो व्यभिचारच ठरतो. मग तुम्ही त्याला पुनर्विवाह म्हणा की कांही म्हणा. धर्मशास्त्राने तो व्यभिचार ठरतो.

—म्हणजे तुमचें म्हणणें असें की पति मेल्यानंतर देखील तिच्या शरीरावर त्याची सत्ता राहते.

—हो, उघडच आहे. आणि म्हणूनच तिने ब्रह्मचर्य पाळायचें किंवा सती जायचें, एवढे दोनच मार्ग शास्त्रांत सांगितले आहेत, असें श्रींनी सांगितलें.

—बरें मग पुरुषांनी एक बायको जिवंत असतांना दुसरी, किंवा आणखी कितीहि केल्या तरी चालतात, किंवा रखेलीहि ठेवलेली चालते, हें कसें काय ? तो व्यभिचार होत नाही का ?

—तो पुरुषांचा हक्कच आहे, तो व्यभिचार नाही. हक्काच्या पलीकडचा समागम म्हणजे व्यभिचार. पुरुषांचा तो व्यभिचार नाही होत.

—थोडक्यांत सांगायचें म्हणजे पुरुषांना मनांत आणलें तरी व्यभिचार करतां येणारच नाही, असेंच की नाही ? कारण त्यांना वाटेल तितक्या बायका करतां येतात, आणि रखेल्याहि ठेवतां येतात. मग व्यभिचार करणार कसा ?

—येथे तुम्ही चुकतां आहांत पहा. मीं आत्तांच सांगितलें की अधिकाराबाहेरचा समागम म्हणजे व्यभिचार. पुरुषांना देखील परस्त्रीशीं समागमाचा अधिकार नाही, तो व्यभिचारच होणार. धर्मशास्त्रानें पुरुषांना तसे कांही अगदीच मोकळे सोडलेले नाहीत. अहो मोकळे सोडले तर धर्मशास्त्र काय करायचें? निर्बंध म्हणजेच धर्म. श्रींनी सांगितलेंच की भावनांना धर्मात सवड नाही. जें नशिबीं असेल तें मुकाट्याने सोसलें पाहिजे. तेथे लटपट नाही चालायची.

—बरें, पण कांही स्मृतींमध्यें नवरा मेल्यावरच नव्हे तर नवरा जिवंत असूनही विशिष्ट प्रसंगीं पुनर्विवाहाला परवानगी दिली आहे तें कसें ?

—अहो त्या वेळीं परवानगी होती. पण तें कलियुगाकरतां सांगितलेलें नाही. तें कलिवर्ज्य आहे.

—पण हें ठरवायचें कसें ? कांही स्मृतींत पुनर्विवाहाला परवानगी आहे, कांहीत नाही. तुम्ही म्हणतां ज्यांत परवानगी आहे त्या कलियुगाकरतां नाहीत. आम्ही त्याच्या उलट म्हटलें तर ?

--तेंच तर मी सांगतों आहें तुम्हाला मघांपासून. हा सामान्य जनांचा विषय नव्हे, हा शास्त्र्यांचा विषय आहे. या चर्चेला वास्तविक श्रींनी संमतिच द्यायची नाही. सरळ सांगायचें की तुम्हाला काय चर्चा करायची असेल ती करा. ती मला बंद करतां येत नाही, पण मी त्यांत पडणार नाही. अमुक मुद्यावर माझा निर्णय तुम्हाला पाहिजे असेल, तेव्हा माझ्याकडे या, म्हणजे मी देईन. मला तुमच्या चर्चेची जरूर नाही. तुम्ही मला काय शिकवणार? श्रींनी आपला दर्जा संभाळून रहायला पाहिजे होतें. ते उगीच यांत पडले.

--वा! म्हणजे शंकराचार्यांची चूक काढतां आहां की तुम्ही!

--हो, हो. म्हणजे चूक कां काढूं नये? मनुष्य चुकीला पात्र आहे.

--पण शंकराचार्य देखील जर चुकीला पात्र असले, तर त्यांनी दिलेला निर्णय चुकीचा नाही कशावरून? तुम्ही एकदां म्हणतां शंकराचार्यांचा निर्णय मान्य करावा, आणि पुनः म्हणतां तेहि चुकीला पात्र आहेत म्हणून. मग खरें काय समजावें?

--हें असें चालायचेंच. कोर्टांत खटला गेला म्हणजे न्यायाधिशाला निकाल द्यावा लागतो. तो चुकण्याचा संभव असतो, आणि पुष्कळ वेळां तोच खटला वरच्या कोर्टांत गेला तर दुसराच निकाल होतो. अर्थात् वरचा न्यायाधीश देखील मनुष्यच, तेव्हां तो देखील चुकण्याचा संभव असतोच, तरीपण करणार काय? कोठेतरी थांबायला पाहिजेच ना? तेव्हा असें ठरवावें लागतें की एकाहून एक वरचढ अशा दोन तीन कोर्टांत खटला जाऊन शेवटीं आतां यापुढे कोर्ट नाही, म्हणजे शेवटचा निकाल खरा मानावा लागतो.

--म्हणजे तो तत्वतः खरा नव्हे, तो मानावा लागतो इतकेंच.

--हो तर काय?

--तर मग शंकराचार्यांचा निकाल म्हणजे कांहीं तात्विक सत्य नव्हे, धार्मिक लोकांना त्याप्रमाणें वागावें लागतें इतकेंच. असेंच की नाही?

--हं-अं. ---- . .

--पण पापपुण्याचा प्रश्न तात्विक सत्यावर अवलंबून असतो, नाही का ? मग तेथे चुकीचा संभव असून कसें चालेल ? तात्विक सत्य जोंपर्यंत कळलें नाही, तोंपर्यंत हा प्रश्न सुटत नाही.

--तो प्रश्न फार बिकट आहे, पण व्यवहार अगदी सोपा आहे. व्यवहारांत मनुष्य रूढीप्रमाणें वागतो, आणि तेंच ठीक आहे. 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी.'

—बरें तें झालें, पण स्त्रीला जर एकच पति विहित आहे, तर मग द्रौपदीला पांच नवरे कां हो ? ती श्रीकृष्णाची लाडकी म्हणून ? पुनर्विवाह म्हणजे जर व्यभिचार होतो, तर एकाच वेळीं पांच नवरे म्हणजे व्यभिचार नव्हे का ?

— अहो नियम आहे तेथे अपवाद असायचाच. त्यांतून अर्जुनाने जेव्हा द्रौपदीला जिंकून आणली, तेव्हा कुंतीनें सांगितलें की काय आणलें असाल तें वांटून घ्या. माता म्हणजे प्रत्यक्ष देवता, तिची आज्ञा कशी मोडायची ? आणि शिवाय भगवद्गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णाने त्याला अनुमोदन दिलें. मग त्यांत पापच राहिलें नाही. पापाची जबाबदारी प्रत्यक्ष देवांनी घेतल्यावर मग त्याला काय हरकत आहे ?

—कुंतीला लग्नापूर्वी एक मुलगा झाला होता, नाही ? तरी तिचा देवपणा कायमच राहिला म्हणायचा ! आणि श्रीकृष्णाने स्वतःची जशी वैचित्र्याची सोय भरपूर करून ठेवली होती, तशी द्रौपदी त्याची आवडती असल्यामुळे तिचीहि करून दिली ! असेंच की नाही ?

—हें पहा, माता म्हणजे देवता. तिचें चरित्र मुलांनी पहायचें नसतें. ती सांगेल तें मुकाट्याने ऐकायचें असतें. आणि श्रीकृष्ण हा तर खराच देव होता. तेव्हा त्याला पापहि लागणें शक्य नाही आणि पुण्यहि नाहीं. तुम्ही धार्मिक दृष्टीने विचार करायला शिका, म्हणजे तुम्हाला हें सगळें बरोबर कळेल.

—माफ करा महाराज ! असला धर्म आम्हाला नको आहे. तुम्ही आणि तुमचे शंकराचार्य, खुशाल आपला धर्म घेऊन बसा. पण दप्तरीशास्त्र्यांशीं वाद करायची कांही श्रींची छाती झाली नाही हें लक्षांत ठेवा.

—अहो कोण कोठले दप्तरीशास्त्री, आणि ते म्हणे शंकराचार्यांशी वाद करणार ! तोंड तर बघा. शंकराचार्य काय असे हव्या त्याशीं वाद करीत असतात वाटतें ?

—शंकराचार्यांचेंच आतां उच्चाटन करायला पाहिजे. एरवीं त्याला आतां उपाय नाहीं.

—कोणाची माय व्यायली आहे शंकराचार्यांचें उच्चाटन करायची ? पाहूं तर खरें ! उगीच आपली उचलली जीभ आणि लावली टाळ्याला ! असें कांहीतरी बोलण्यांत काय अर्थ आहे ?

—बरें, तुम्ही फार तापलां आहांत आतां. आपण पुनः केव्हा तरी बोलूं.

---

# सूड

—:०:—

‘ गी द मोपॅसां ’ वरून

एक सरकारी वकील आपल्या आठवणी सांगत होता. “ एका शाळा मास्तरावर खुनाचा आरोप होता. त्यापूर्वी तो हुशार, विचारी, धार्मिक मनुष्य असल्याबद्दल त्याची ख्याती होती. त्याने लग्न केलें होतें आणि त्याला तीन मुलें झालीं होतीं, पण तीं तिन्ही फुप्फुसांच्या विकाराने मेलीं होतीं. यानंतर तो आपल्या शाळेंतील मुलांवर अतिशय प्रेम करूं लागला आणि त्यांतल्या त्यांत चांगल्या मुलांना तो स्वतःच्या खर्चानें खेळणीं आणि खाऊ आणून देत असे, यामुळे तो सर्वांना आवडूं लागला होता. पण त्याच्या शाळेंतल्या मुलांपैकी पांच मुलें अकस्मात् मेलीं आणि कोणालाहि त्याचें कारण सांपडेना. त्यांना अशक्तता येई, कांहीहि खाववेना, पोटांत दुखूं लागे, आणि मरतांना अतिशय वेदना होत. यांतला शेवटचा मुलगा मेला तेव्हा त्याचें शरीर तपासून पाहिलें, पण त्यांत कोणतेंहि विष सांपडलें नाही.

नंतर एक वर्षपर्यंत सर्व ठीक होतें. नंतर त्याच्या वर्गांतील दोन हुशार मुलें आजारी पडून चार दिवसांत मेलीं, आणि त्यांचीं शरीरें तपासतां त्यांत कांचेचे बारीकबारीक तुकडे सांपडले. अर्थात् त्यांनी निष्काळजीपणाने तयार केलेला कांही पदार्थ खाल्ला असला पाहिजे, असें समजून त्यासंबंधी पुढे कांही झालें नाही. पण इतक्यांत त्या मास्तराची मोलकरीण आजारी पडली, आणि आजाराचीं सर्व चिन्हें त्या दोन मुलांसारखींच होतीं. आणि डाक्तराने तिला प्रश्न करतां तिने कबूल केलें कीं मास्तराने मुलांकरतां आणून ठेवलेल्या खाऊपैकी मीं थोडासा चोरून खाल्ला. पोलिसाने मास्तराच्या घराची झडती घेतली. आणि खाऊच्या पेट्या जप्त करून तपासून पाहतां त्यांत कांचेचे आणि सुयांचे तुकडे सांपडले. अर्थात् मास्तरला गिरफदार केलें. तरीदेखील तो अपराधी आहे असें मला वाटेना, इतकें त्याच्याबद्दल लोकमत चांगलें होतें. इतका चांगला, धार्मिक मनुष्य लहान मुलांना कसा मारील? हें खरें असलें तर त्याला खात्रीने वेड लागलें असलें पाहिजे. पण इतक्या हुशार आणि समजूतदार माणसाला वेडा कोण म्हणेल? तरी पण त्याच्याविरुद्ध अधिकाधिक पुरावा सांपडत होता. तो ज्या दुकानांतून मिठाई घेत असे, तेथली मिठाई तपासून पाहतां त्यांत कांहीच सांपडलें नाहीं. तेव्हा आरोप खरा दिसूं लागला.

त्याने आपल्या बचावांत असें सांगितलें की त्यांतल्या एका मुलाच्या मरणाने एका मनुष्याला खूप पैसे मिळणार होते, तेव्हा त्याला मारण्याकरतां आणि त्याचा संशय मजवर ढकलण्याकरतां त्या मनुष्याने खाऊचें कपाट उघडून त्यांत कांचेचे तुकडे घालून ठेवले. अर्थात् यामुळे इतर मुलेंहि मेलीं, पण त्याला इलाज नव्हता. ही गोष्ट त्याने इतक्या आत्मविश्वासाने सांगितली, की ती खरी मानून त्याला सोडून द्यावा असें आम्हाला वाटलें होतें, परंतु इतक्यांत त्याच्याविरुद्ध आणखी पुरावा मिळाला. तो ज्या टेबलाच्या गुप्त खणांत पैसे ठेवीत असे, त्या खणांत त्याची स्वतःची तपकीरीची डबी कांचेच्या तुकड्यांनी भरलेली सांपडली. तीहि त्याच दुष्टाने ठेवली असें त्याने सांगितलें, पण याच

सुमाराला शेजारच्या गांवांतल्या एका व्यापाऱ्याने न्यायाधिशांची भेट घेऊन त्याला सांगितलें की हा मास्तर माझ्या दुकानांत येऊन शक्य तितक्या बारीक सुया खरेदी करीत असे. त्याने आपल्याबरोबर पुरावा आणला होता, आणि त्याने सांगितलेल्या दिवशीं मास्तर त्या गांवीं गेल्याचें सिद्ध झालें. शाळेंतील कांहीं मुलांनीहि साक्ष दिली की तो मुलांना आपल्या देखत खाऊ खायला लावीत असे आणि राहिलेला भाग काळजीपूर्वक नाहीसा करीत असे.

यानंतर तो सुटणें अशक्य होतें. त्याला शिरच्छेदाची शिक्षा झाली. त्यावर त्याने केलेलें अपील काढून टाकलें. आतां बादशहाकडे माफीची मागणी करण्यापलीकडे कांही राहिलें नव्हतें. तो माफी देणार नाही असा सर्वांचा अंदाज होता. त्याचा निकाल होण्यापूर्वी एके दिवशीं तुरुंगांतला पाद्री मजकडे आला आणि म्हणाला ' हा मनुष्य निरपराधी आहे, तो फाशी गेला तर ती जबाबदारी तुमचे-वर राहील. ' इतकें म्हणून तो निघून गेला. याने मला मोठा धक्का बसला, आणि माझ्या विनंतीवरुन माझ्या वडिलांनी स्वतः बादशहाची मुलाखत घेतली. त्यांचें बादशहाजवळ वजन होतें. दुसरे दिवशीं बादशहाने मला बोलावलें आणि मीं सर्व हकीकत सांगितली. मी सांगत असतांना बादशहाच्या मागचा दरवाजा उघडला आणि राणीसाहेब आंत आल्या. त्यांचें मत विचारतां त्यांनीहि तो निरपराधी आहे आणि त्याला क्षमा केली पाहिजे असें सांगितलें. कां असेल तें असो, पण हें ऐकून माझा मात्र उलट ग्रह झाला. अपराधी मनुष्याला बांचव-ण्याकरतां हा एखादा कट असावा असा मला संशय आला. पण राणीसाहेब म्हणाल्या ' दहा अपराधी सुटले तरी चालतील, पण एकहि निरपराध्यास शिक्षा होतां नये, असें कायद्याचें तत्व आहे. ' झालें, शिरच्छेदाची शिक्षा रद्द होऊन त्याला जन्मठेप सक्तमजुरीची शिक्षा दिली.

तुरुंगांत त्याची वागणूक अतिशय उत्तम होती अशी बातमी कांही वर्षांनी बादशहापर्यंत पोंचली, आणि तुरुंगावरच्या अधिकाऱ्याने त्याला आपल्या घरीं नोकर म्हणून ठेवला असें मला समजलें.

यानंतर दोन वर्षांनी एकदां बाहेरगांवीं एका नातेवाईकाच्या घरीं मी जेवायला बसलों असतां एक पाद्री मजकडे आला आणि म्हणाला 'एक मरणोन्मुख मनुष्य आपल्या भेटीची इच्छा करतो आहे. आपण भेटलांत तर तो सुखाने मरेल.' हा अनुभव मला नवीन नव्हता, तेव्हा मी त्याच्याबरोबर गेलों आणि पाहतों तों एक केवळ हाडें राहिलेला मनुष्य एका घाणेरड्या खोलींत भिंतीला टेकून बसला होता. त्याच्या डोळ्यांत मात्र अजून तेज दिसत होतें. मी त्याला ओळखलें नाही, पण त्याने ओळख दिली. 'खुनाच्या आरोपांतून सुटलेला शाळामास्तर तो मी.'

'तुम्ही या ठिकाणीं कसे आलांत?' मी विचारलें.

'ती बरीच लांब हकीकत आहे, ती सांगायला वेळ नाही. कारण मी मरतों आहें. लोकांनी या पाद्र्याला मजकडे आणला, पण तुम्ही येथे आहांत असें समजल्यावरून मीं तुम्हाला बोलवायला सांगितलें. पापांचा पाढा पाद्र्यासमोर वाचायचा असतो, पण मला तुमच्याजवळ सांगणें जास्त बरें वाटतें, कारण तुम्हीं मध्यस्थी करून माझा जीव एकदां वांचवला होता. आतां मला तुमच्याजवळ खरें सांगणें भाग आहे. तीं मुलें मींच मारलीं. कशाकरतां म्हणाल तर सूड उगवण्याकरतां. पूर्वी माझें जीवन अत्यंत शुद्ध आणि पवित्र होतें, दयाळू ईश्वराची मी भक्ति करीत होतों. काय समजलांत? दयाळू ईश्वराची. जो चोर, बदमाष, खुनी ईश्वर पृथ्वीवर राज्य करतो, त्याची नव्हे.

'मी लग्न केलें आणि मला तीन मुलें झालीं. त्यांच्यावर माझें इतकें प्रेम होतें की मी त्यांच्याकरतांच जगत होतों म्हटलें तरी चालेल. तीं तिन्ही मुलें मेलीं. कां? मीं ईश्वराचें काय केलें होतें? कां त्याने माझीं मुलें मारलीं? तत्क्षणीं माझे डोळे उघडले, आणि माझी खात्री झाली की ईश्वर दुष्ट आहे, खुनी आहे. तो दररोज कोणाला ना कोणाला मारतो आणि स्वतःच्या करमणुकीकरतां वेगवेगळया रीतींनी मारतो. कोणी आजाराने मरतो, कुणी

अपघाताने मरतो, असे लोक मरत असतात आणि ईश्वर हंसत असतो. त्याला फारच कंटाळा आला म्हणजे तो एखादी सांथ आणतो. प्लेग, पटकी, देवी, त्याला काय कमी आहे? मधून मधून तो लढाया करवतो आणि हजारों लोक एकदम कसे मरतात ती गंमत पहातो. इतकेंच करून त्याचें समाधान होत नाही. तो माणसांकडूनहि माणसें खाववतो. पण कांहीं दिवसांनी माणसें सुधारून एकमेकांना खात नाहीशीं झालीं, तरी हिंस्र पशु तें काम करतातच. पण एवढ्यानेच काय होईल? त्याने अनंत प्राणि उत्पन्न केले आहेत. कांही एखादाच दिवस जगतात, कांही आपल्या पायांखाली चिरडून मरतात, पण हे प्राणि कितीहि बारीक असले तरी त्याला दिसतात आणि तो ही सगळी गंमत पहात आकाशांत बसतो. तेव्हा मीं म्हटलें मीं तरी कां मुलें मारूं नये? ईश्वरच कोण मारणार? तेव्हा मीं तीं मुलें मारलीं. आणि आणखीहि मारलीं असतीं, पण तुम्हीं मला पकडून नेलेंत.

'मला शिरच्छेदाची शिक्षा झाली आणि ईश्वर गंमत पहायला तयारच होता. तेव्हा मी पाद्र्याला बोलावला आणि त्याच्याजवळ खोटें बोललों. मरतेवेळीं मीं खोटें बोलणार नाही असें त्याला वाटून त्याने मजबद्दल रदबदली केली आणि मी वांचलों. आतां मी मरतों आहें, पण आतां मी ईश्वराला पुरा ओळखतों. आतां मी त्याला भीत नाही' इतकें म्हणून तो थांबला.

'झालें तुमचें? आतां कांही सांगायचें नाही?' मी म्हणालों.

'नाही.' 'नमस्कार तर मग.'

'नमस्कार, तुम्हालाहि एक दिवस मरायचेंच आहे!'

पाद्री तेथे बसलेला होता, त्याला मीं म्हटलें, 'तुम्ही येथे बसणार?' तो म्हणाला 'मी बसणार.' त्या दोघांना तेथेच सोडून मी पळून गेलों."

# " एम्. बी. ६९३ "

——++×——

लेखक, एक डाक्तर

समाजस्वास्थ्याच्या सप्टेंबरच्या अंकांत या औषधाबद्दल ' प्रेस मेडिकॅल ' नांवाच्या फ्रेंच नियतकालिकांतून घेतलेला सारांश छापला आहे. या नवीन उत्पन्न झालेल्या डॉक्टरांच्या लाडक्या औषधाबद्दल सुचलेले विचार व अनुभव उपयुक्त म्हणून दिले आहेत.

' एम्. बी. ६९३ ' हें आधुनिक रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेंत नुकतेंच जन्मलेलें बालक आहे. हें बाळ फार चांगलें आहे, गोजिरवाणें आहे, अशी त्याची ' डायोन पंचकडी ' पेक्षा थोड्या काळांत जगभर प्रसिद्धि झाली आहे. जिकडे-तिकडे त्याची वाहवाच ऐकूं येत आहे. या बाळाच्या एकंदर सद्गुणांमुळे त्याने मिळविलेल्या १।-१॥ वर्षांतील लौकिकाबद्दल शर्लें टेंपलला पण हेवाच वाटावा. पण थांबा, या बाळाने जसे आपले सद्गुण दाखवले तसेच आपल्या अंगचे गुण उधळायलाहि सुरवात केली आहे, तिकडे काणाडोळा करून चालणार नाही. मी या बालकाचे गुण चाहणारांपैकीच एक आहें, तरीपण या बालकाचे दोष, दुर्गुण, नाहीसे झाल्यास हेंच बालक एक सर्वोत्कृष्ट नमुना म्हणून पुढें ठेवतां येईल. असो, या अलंकारांतून आपण प्रत्यक्षांत येऊं या.

६९३ हें औषध गेल्या १७-१८ महिन्यांतच वैद्यकीय व्यवसायांतील लोकांच्या हातीं आलें आहे. मुख्यत्वेंकरून न्युमोनियाचें मारक औषध म्हणून हें बाहेर पडलें. सुरवातीपासूनच न्युमोनिया, ब्रॉंकोन्युमोनिया सारख्या फुप्फुसांच्या रोगांवर हें तत्पूर्व औषधांपेक्षा फारच गुणकारी दिसूं लागलें. हजारों रोग्यांना या औषधाने जीवदान दिलें. यापूर्वी न्युमोनियाचे अर्धेअधिक रोगी मरत असत, तेच आतां हें औषध हातीं आल्यापासून शेंकडा ५-१० रोगीच काय ते दगावतात व शेंकडा ९० तरी रोगी या औषधामुळे हमखास बरे होऊं

लागले आहेत. नऊ दिवसांचा न्युमोनिआ रोग या औषधाने तीन दिवसांवर आणला, व मृत्युसंख्या तर चांगलीच हटली.

न्युमोनियाचा जंतु न्युमोकॉकस व परम्याचा गॉनोकॉकस हे दोन्ही सदृश असल्यामुळे ( फरक एवढाच की न्युमोकॉकसला एक पातळ वेष्टन असतें, तें या गणूकाकाला नसतें ) साहजिकच हें औषध या रोगावरहि तसेंच मारक आहे की कसें, हे प्रयोग जिज्ञासू डाक्टर करूं लागले. परम्याच्या शेंकडों रोग्यांवर हे प्रयोग सुरू झाले. लवकरच या प्रयोगांचे अनुभव प्रसिद्ध होऊं लागले, पण बारकाईने पाहिल्यास हें औषध न्युमोनियावर जसें रामबाण ठरलें तसें परम्याचे बाबतींत मात्र अनुभवास येत नाही. शेंकडा ६०–६५ लोक या औषधाने चांगले सुधारतात, लवकर सुधारतात; जवळजवळ शेंकडा २० रोगी साधारण सुधारतात आणि शेंकडा वीस एक लोकांना या औषधापासून कोणताच फायदा होत नाही.

परम्यासारखा दुष्ट रोग समूळ नष्ट झाला की नाही हें सांगण्याची जबाबदारी ज्याच्यावर असते, त्यालाच धोका कोठे आहे हें समजतें. या रोगाच्या परीक्षाचतुष्टयींतून व्यवस्थितपणें सहीसलामत तावूनसुलाखून निघणारे रोगी किती असतात, इतका धीर किती लोकांना असतो, असें विचाराल तर तज्ञ डॉक्टर सांगेल की १०० रोग्यांपैकीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतके निघणार नाहीत. हा प्रकार आपल्या देशांतील अजाण लोकांचा आहे, तरी पण इतर सुधारलेल्या देशांतहि इलाज संपल्यावर कमींतकमी सहा महिनेपर्यंत डाक्टरच्या सल्ल्याने वागून योग्य प्रकारें परीक्षाचतुष्टयींतून पार पडले असे या औषधाने बरे झालेले किती रोगी निघाले हें पाहणें फार महत्वाचें आहे. लान्सेट, ब्रिटिश मेडिकल जर्नल, प्रॅक्टिशनर, व अमेरिकन मेडिकल जर्नल, या वैद्यकी नियतकालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले लेख अभ्यासले तर नाइलाजाने असें म्हणावें लागतें की या बहुतेक प्रसिद्ध झालेल्या अनुभवांत लांबवरपर्यंत रोगी निरीक्षणांत ठेवून परीक्षाचतुष्टयींतून उत्तीर्ण झालेले, 'कल्चर टेस्ट' करून तीनदां सुटलेले रोगी

फारच थोडे दिसतात. जिकडे तिकडे रोगमुक्ततेच्या परीक्षा लेच्यापेच्या व इलाज संपल्यावर लगेच ८–१५ दिवसांत केलेल्या दिसतात. **येथेच धोका आहे.** सध्यांच्या अनुभवावरून एवढेंच म्हणतां येईल की या रोगावर अचुक व गुणकारी असें पोटांत घेण्याचें औषध अद्याप नव्हतें, तें लवकरच तयार होण्याची सबळ आशा आहे. एम्. बी. ६९३ या औषधाच्या परमाविशिष्ट रोगाबाबत सद्गुणांचा निष्कर्ष असा आहे. या औषधाचे असे दुर्गुण तरी काय आहेत तें पाहूं या.

हें औषध घेऊं लागल्यापासून थकवा फार वाटूं लागतो. न्युमोनिया हा रोग या औषधाने जरी तीन दिवसांत हटतो, तरी नंतरचा अशक्ततेचा काल फारच लांबतो. कित्येक वेळां १५ ते २० दिवस पर्यंत रोगी अशक्त वाटतें म्हणून पडून राहतो. रोग्याच्या हुषारीवर रोग हटणें अवलंबून असतें. मुलांना हें औषध फार संभाळून द्यावें लागतें. एक चतुर्थांश वडी दिवसांतून दोनतीन वेळांच देऊनहि मूल बिचारें मलूल पडून असतें. हा मलूलपणा हें औषध न घेत-लेल्या मुलांत दिसून येत नाही. हा मलूलपणा जाण्यास १५–२० दिवस लागतात.

परम्याच्या रोग्यांत हें औषध असाच प्रकार दाखवतें, कांहीं रोग्यांची झोपच कांही दिवस जवळजवळ नष्ट होते, साहजिकच दिवसभर श्रमिष्ठासारखें वाटतें. कित्येक लोकांना हें औषध घेऊं लागल्यापासून उमासे येऊं लागतात, उलट्या होतात, आणि एकंदर पोट बिघडलें म्हणून तक्रार सुरू होते. एका डॉक्टर मित्राने या औषधाच्या दोन वड्या सहज घेऊन पाहिल्या, बिचारा २४ तास तळमळत होता. रोग्याला रोज सहा वड्या घे म्हणून सांगायला बरें, पण घेणाराची बिचाऱ्याची खात्रीच होते.

परम्याच्या तीव्र प्रकारांत उत्पन्न झालेल्या एकेक दुष्टरोगप्रसारांत (उदा० मूत्राशयाची सूज, बीजवाहक नलिका व अंडाशयाची सूज, अंडवाहक नलिकांची सूज, वगैरे स्त्रियांच्या ओटीपोटांतील रोग) ६९३ औषध जितकें तत्काळ उपयोगी पडते, तितकें रोगनिर्मूलनास ठरत नाही.

न्युमोनियाचा जंतु आपणा सर्वांच्या श्वसनेंद्रियांत व फुप्फुसांत नेहमीच

असतो, पण विशिष्ट परिस्थितींतच तो रोगकारक ठरतो. याविरुद्ध परम्याचा जंतु परस्थ असतो व एकदां का तो दुसऱ्या ठिकाणीं (मनुष्यांत) घुसला की तो आपला पराक्रम गाजवतो. हा जंतू बरेच दिवस आपल्या अंगांत राहिल्याने मात्र आपली प्रतिकारशक्ति वाढते आणि रोगाची तीव्रता तेवढी कमी होते, पण रोग नष्ट होण्याइतकी प्रतिकारशक्ति कधींहि कृत्रिमपणें सुद्धां वाढवतां येत नाही. प्रतिकारशक्तीच्या मदतीला रोगनिर्मूलनाचे तीव्र इलाजच अंमलांत आणावे लागतात.

परम्याकरतां अद्ययावत् असे जे जे इलाज आहेत, त्यांनीहि कांही कालाने इलाज चालू असतांच रोगजंतु दिसत नाहीसे होतात, पण क्वचित् एखादा जो आंत दडून बसला असेल तो हळूच कांही दिवसांनी बाहेर येऊन रोग पुन्हा दृश्यमान होतो. म्हणून रोगजंतु दिसत नाहीसे झाल्यावरहि पुढे अशा रीतीने इलाज करावे लागतात की मूत्रमार्गांतील सर्व लहान मोठ्या ग्रंथि व इतर भेगा वगैरे उघडून धुवून औषधी घालणें वगैरे प्रकार करावे लागतात व नंतरहि निदान सहा महिनेपर्यंत मधूनमधून कसून रोगपरीक्षा करावी लागते.

परम्यासारख्या दुष्ट रोगावर अशीं औषधें रोग्याच्या हातीं देण्यांत एक प्रकारें मोठा धोका आहे. एक तर असें की औषध निष्काळजीपणें किंवा बेजबाबदारपणें घेतलें जाण्याचा संभव जास्त. अशीं औषधें घेत असतां जो कांही त्रास वगैरे होईल, त्यावेळीं काय करावें हें तज्ञ डॉक्टर सांगूं शकेल. तज्ञ डॉक्टरच्या देखरेखीच्या अतिशय उपयुक्त मदतीची त्याला किंमत वाटेनाशी होते व अर्धवट बरे झालेले लोक आपण साफ बरे झालों असें मिथ्याच समजून पुढे घोटाळे उत्पन्न करतील हें वेगळेंच.

'सल्फॅनिलॅमाइड' व त्याचे निरनिराळे कल्प गेल्या ४–५ वर्षांत ॲलोपथी वैद्यकास मिळाल्यापासून कित्येक दुर्धर रोग (उदा० बाळंतरोग 'सेप्टिक्' जखमा, मूत्रपिंडाचे रोग, मूत्राशयाचे विकार, वगैरे) बरे करणें म्हणजे एक जादूचा-प्रयोग झाला आहे. हीं सर्व कल्पद्रव्यें परम्यावर वापरून पाहणें चालूच

आहे व उलटसुलट अनुभव प्रसिद्ध होतच आहेत, पण अनेक वेळां या सर्व औषधी मूत्रमार्गांतील रोगग्रस्त ग्रंथी रोगजंतूंसह बुजवतात असा दाट संशय व संभव वाटतो. या औषधांनी सुधारलेले रोगी कधी कधी आपोआप पूर्ववत् होतात असें पाहण्यांत आहे. एक रोगी या प्रकारच्या औषधांनी चांगला सुधारून सर्व परीक्षा नास्तिपक्षीं येऊन १५ दिवसांनी अंडाशय व शुक्राधारगुच्छाची तीव्र सूज घेऊन आला ( ॲक्यूट् एपिडिडिमो ऑर्कायटिस् ). अशा प्रकारच्या अनुभवासुळे वरील मतास पुष्टि मिळते.

परम्यासाठी हीं आधुनिक औषधें उपयुक्त आहेत याबद्दल वादच नाही, पण त्यांचा उपयोग तज्ज्ञ डाक्टरांच्या सल्ल्यानेच करावा. तज्ज्ञांच्या देखरेखीखाली नसलेल्या रोग्याने हीं औषधें घेणें फार धोक्याचें आहे असें एकंदर अनुभवावरून म्हणावें लागतें. शिवाय हीं औषधें फक्त पोटांत घेण्यापेक्षा बरोबर स्थानिक इलाज ( औषधी जलांनी मूत्रमार्ग धुणें वगैरे ) करणें जास्त उपयुक्त आहे हें सर्वमान्यच आहे. प्रस्तुत लेखकाच्या मतें ६९३ सारख्या औषधांचाच स्थानिक उपयोग करतां आल्यास हेंच औषध जास्त उपयुक्त ठरून त्याचे इतर सर्व परिणाम टळतील. तशा प्रकारचे प्रयोग चालू आहेत. कालांतराने हेंहि शक्य व सिद्ध होईल अशी आशा आहे.

---

# अर्धनारी ?

' प्रेस मेडिकॅल ' वरून

उत्तर आफ्रिकेंतील आल्जीरिया नांवाच्या फ्रेंच प्रदेशांतील मुस्ताफा येथील इस्पितळांत २३ दिसेंबर १९३७ रोजीं एक मनुष्य जननेंद्रियाच्या विकृतीबद्दल सल्ल्याकरतां आला. तो तेथील रहिवासी असून त्याचें वय १८ वर्षें होतें आणि तो प्रकृतीनें सुदृढ दिसत होता. तथापि त्याचा आवाज बायकी होता आणि गाल फुगीर असून दाढीमिशीचा मागमूस नव्हता. तो तेथील एका शाळेंत विद्यार्थी होता.

त्याची जन्मनोंद मुलगा म्हणून झाली होती. त्याला पूर्वी म्हणण्यासारखा कोणताही आजार झालेला नव्हता. त्याच्या आईबापांची शरीरप्रकृति चांगली होती. मुलांपैकीं तो सर्वांत वडील होता, आणि त्याला आणखी तीन भाऊ व दोन बहिणी असून त्यांच्यांत कोणताही दोष नव्हता. त्याच्याहि तपासणीवरून त्याला कोणताही रोग असावा असें दिसलें नाही. त्याला त्या वयाच्या मुलीला शोभतील एवढे दोन स्तन होते, व बोंडीभोंवती काळा भाग मुलीप्रमाणेच होता. ढुंगण स्त्रियांसारखें मोठें असून कातडी मऊ होती. केंस फारच कमी होते. सारांश एकंदर शरीर स्त्रीचें होतें.

जननेंद्रियाची तपासणी करतां पुरुषेंद्रियाचे मानाने फार लहान व योनि-लिंग म्हणावें तर फार मोठें, असें एक इंद्रिय आढळलें. त्याची लांबी दोन सेंटिमीटर म्हणजे एक इंचापेक्षा कमी होती. त्याच्या टोंकाला पुरुषांप्रमाणे मूत्रमार्ग नसून तो भाग किंचित् आंत गेलेला होता इतकेंच. त्याच्या खालच्या बाजूला एक छिद्र होतें व तेथून मूत्रोत्सर्ग होत असे. डाव्या बाजूला एक अंडकोष असून त्यांत एक पावटयाएवढी बी हाताला लागत होती, व त्याभोंवतीचें वेष्टण नेहमीसारखें लागत होतें व रेतवाहक नलिकाहि लागत होती. उजव्या बाजूला मात्र स्त्रीच्या महाभगोष्ठासारखें दिसत होतें. सारांश त्याच्या जननेंद्रियाची डावी बाजू पुरुषासारखी आणि उजवी स्त्रीसारखी होती. मलद्वारांतून तपासणी करतां मध्यभागीं प्रोस्टेट ग्लँड किंवा गर्भाशय यांपैकी कांहींच सांपडत नव्हतें. उजव्या बाजूला मात्र एक गांठ लागत होती व स्पर्श केल्यास ती दुखत होती.

त्याला प्रश्न करतां त्याने सांगितलें की त्याला कामेच्छा वारंवार होत असे आणि नेहमी स्त्रियांसंबंधीच आकर्षण वाटत असे. अशा स्थितींत त्याच्या इंद्रियाचा आकार न वाढतां तें केवळ कठिण होत असे, आणि त्यांतून एक प्रकारचा चिकट रंगहीन स्राव होत असे. अर्थात् इंद्रियाच्या आकारामुळे समागम अशक्य होता. तसेंच १२ व्या वर्षापासून त्याला कधी पंधरा दिवसांनी, महिन्याने, किंवा दोन महिन्यांनी उजव्या बाजूला पोटांत दुखत असे व मूत्र-

स्रावानंतर त्याच मार्गाने थोडासा रक्तस्राव होत असे. असें एका दिवसांत तीन चार वेळां होत असे, पण ही स्थिति एकच दिवस टिकत असे.

या मनुष्याचें पुढे काय करायचें हें ठरवण्यापूर्वी त्याला केवळ निरीक्षणाकरतां दोन महिने ठेवून घेतला. तेव्हा १३ जानेवारी १९३८ रोजीं सायंकाळीं त्याच्या पोटांत उजव्या बाजूला खूप दुखूं लागलें. रात्रीं थोडा रक्तस्राव झाला, पण दुखणें सकाळीं पांच वाजेपर्यंत थांबलें नाही. नंतर १९ जानेवारीपासून २२ फेब्रुवारीपर्यंत त्याला अंतःस्रावाच्या टोंची दिल्या. त्या प्रथम एका दिवसाआड व नंतर दररोज एक याप्रमाणे दिल्या त्या चालू असतां फेब्रुवारीला म्हणजे बरोबर २८ दिवसांनी पुनः पोट दुखून रक्तस्राव झाला व या वेळीं तो पांच दिवसपर्यंत चालू राहिला. यानंतर १४ दिवसांनी, म्हणजे २४ फेब्रुवारीला, पुनः पोट दुखलें. तें बहुधा एक बीज पक्व होऊन बाहेर पडल्यामुळे असावें. याच अवधींत डाव्या बाजूच्या अंडकोषांतील अंडाच्या आकारातहि वाढ झालेली दिसली, आणि तो दाबल्यास दुखूं लागला.

आतां काय करावें हें ठरवणें कठिणच होतें. बाह्यतः हा मनुष्य स्त्रीसारखाच दिसत होता, परंतु योनिमार्ग नसल्यामुळे पुरुषाशी संयोग अशक्य होता. शिवाय तो मुलगा म्हणून नोंदलेला होता इतकेंच नव्हे तर तो पुरुषांबरोबर वाढला होता, त्याला स्त्रियांविषयी आकर्षण होतें, आणि स्वतः स्त्री होण्यांत त्याला कमीपणा वाटत होता. तो अरबी होता आणि अरबी लोक स्त्रीला किती कमी दर्जाची समजतात हें पाहिलें म्हणजे त्यांत आश्चर्य कांहींच नव्हतें. तेव्हा शस्त्रक्रिया करून अंतरिंद्रियें कशा प्रकारचीं आहेत हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय आम्हाला कांहीच निकाल करणें शक्य नव्हतें.

ही शस्त्रक्रिया १० मार्चला केली. बेंबीच्या खाली मध्यावर उभा छेद घेतल्यावर पाहिलें तों डावी व उजवी बाजू एकमेकांपासून अगदीं भिन्न प्रकारच्या दिसत होत्या. उजव्या बाजूला गर्भाशय व त्याचें उजव्या बाजूचें बंधन, उजव्या बाजूची बीजवाहक नलिका, आणि उजवा बीजकोश व डाव्या बाजूला एक रेतवाहक नलिका स्पष्ट दिसत होतीं. गर्भाशय मध्यरेषेच्या

उजव्या बाजूला होता व त्याला जोडून योनिमार्ग जाड, चपट्या फितीसारखा असून मध्यरेषेपर्यंत गेला होता, आणि मूत्रमार्गाला पूर्णपणें चिकटलेला होता. डाव्या बाजूला सर्व पुरुषासारखें असून रेतवाहक नलिका आणि रेताशयहि दिसत होता. मध्यरेषेवर दोन्ही प्रकारांचा सांधा होऊन एक लांबोडी गांठ बनली होती.

हें पाहून बीजकोश व बीजवाहक नलिका कापून काढलीं. गर्भाशय काढूं नये असें ठरवलें, कारण मूत्रमार्गाला भोंक पडण्याचा संभव होता. पोट पुनः शिवून झाल्यावर अंडकोशांतील गांठींत टोंचून त्यांतील थोडा द्रव काढून तपासतां त्यांत रेतजंतु सांपडले नाहीत. नंतर अंडकोश कापून पाहिलें तों अंडाचा आकार बदामापेक्षां किंचित् लहान दिसला, पण बाकी सर्व भाग असावे तसे दिसले. नंतर तें सर्व शिवून टाकलें. नंतर कापून काढलेला स्त्रीबीजकोश तपासला. याचा एकंदर निष्कर्ष असा निघाला की या दोन प्रकारच्या बीजकोशांपैकी स्त्री-बीजकोशच अधिक सुस्थितींत होता. तो कापून काढल्यावर पोटदुखी व रक्तस्राव अजीबात बंद झाली. अंडाचा आकार आपोआप वाढला, आणि उत्थापन अधिक जोराने आणि वारंवार होऊं लागलें, आणि स्तन पूर्वींच्या मानाने विशविशीत लागूं लागले. पुंबीजकोशाला अधिक उत्तेजन देण्याकरतां पूर्वींप्रमाणेंच टोंची दिल्या, तेव्हा जननेंद्रियाचा आकार दुप्पट झाला, अंडकोशाचाहि वाढला आणि उत्थापन अधिक चांगलें होऊं लागलें. त्यांतील स्राव तपासतां त्यांत कांहीं रेतजंतु सांपडले, पण त्यांना विशेष हालचाल नव्हती. स्तनग्रंथि नाहीशा होऊन तेथे फक्त चरबी राहिली. तरी देखील एकंदरींत स्वरूप स्त्रीचेंच राहिलें, आणि चेहऱ्यावर बिलकुल केंस आले नाहीत. उपचार अजून चालू आहेत.

यांत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे की ज्या टोंची दिल्या म्हणून वर सांगितलें आहे, त्यांचा उत्तेजक परिणाम दोन्ही बीजकोशांवर झाला, पण स्त्रीबीजकोशावरच विशेष झाला. परंतु स्त्रीबीजकोश काढल्यावर त्यांचा परिणाम पुंबीजकोशावर अधिक जोराचा झाला. यावरून स्त्रीबीजकोशांतील अंतःस्रावामुळे पुंबीजकोशाच्या वाढीस अडथळा होत होता असें दिसतें.

( 'प्रेस मेडिकॅल,' २५-३-३९ )

# ग्रंथपरीक्षण

१. **नवें जहाज**, लेखक ना. के. शिरोडकर; प्रकाशक, हिरजी मोहनजी, शंकर बारी लेन, लोहाणा सिमेटरी, ठाकुरद्वार, मुंबई–२. पृष्ठें १०४, किंमत २ रु.

हा कथासंग्रह असल्याचें अंतःपृष्ठावर नमूद केलें आहे. पुस्तकाला अनुक्रमणिका नाही, आणि बहुतेक 'कथांना' कथानक नाही. 'बिंबा' ही शेवटचीच कथा घ्या. लग्नानंतर थोड्या दिवसांनी वैवाहिक समागमाला कंटाळलेल्या बिंबाला वेड लागतें. आटोपलें कथानक. 'कर्तव्य पण किती कठोर' या गोष्टींत इंग्लंडमधील एका प्रख्यात जंगलांतील वाघांनी फोडलेल्या डुरकावण्यांचें मोठें रसभरित वर्णन आहे. इंग्लंडमधें वाघ नाहीत, एवढें सुद्धां या लेखकमहाशयांना माहीत नाही.

पुस्तकाची भाषा अतिशय क्लिष्ट व बोजड आहे. एक मासला पहा, 'बाह्यतः शंतू इतका जरी कंगाल नव्हता तो वर्तनानें, तरी मानवी स्वभावांतील एक नाटकी कप्पा त्याच्याहि ठिकाणीं वसत होता अदृश्यरीत्या' (पृ. ६३). नाही म्हणायला 'हेमकुंज' 'वावटळींतील वृक्ष' वगैरे एकदोन रूपकात्मक कथा बऱ्या आहेत. **शकुंतला परांजपे.**

२. **गुंतागुंत**. लेखक, मा. कृ. शिंदे; प्रकाशक, जयवंत बाबूराव जगताप, बी. ए. ( ऑनर्स ), १२४८ शुक्रवार, पुणें शहर. पृ. ६८, किंमत ८ आणे.

या नाटकांत कांही अर्थ नाही. **शकुंतला परांजपे.**

---

# पत्रव्यवहार

आपलीं कांही पुस्तकें व समाजस्वास्थ्याचे कांही अंक माझ्या वाचण्यांत आले आहेत. आपण निःस्वार्थ बुद्धीने आपणांस योग्य वाटलेलें समाजहिताचें

कार्य करीत आहांत, यामुळें मला आपल्याविषयीं अत्यंत आदर आहे, परंतु याचा अर्थ असा नव्हे की मला आपण प्रतिपादन करीत असलेलीं सर्वच मतें मान्य आहेत. माझे एक मित्र आपले नियमित वाचक आहेत. अर्थात् आपल्या मतांचा त्यांचेवर परिणाम झालेला मला दिसून आला आहे आमच्या वादविवादांत ते आपलीं मतें जेव्हा प्रतिपादन करतात, तेव्हा आपल्या लिखाणाचा आधार देतात. त्यांना समर्पक उत्तर देण्यापूर्वी, ते आपला आधार घेत असल्यामुळे, आपलें म्हणणें तरी काय आहे हें नीट समजावें म्हणून मी येथे मिळतील तेवढीं आपलीं पुस्तकें व मासिकें वाचलीं. त्यामुळे बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला. त्याचप्रमाणे कांही नवीन शंकाहि उत्पन्न झाल्या. प्रथमतः मला एक गोष्ट कबूल केली पाहिजे की आपल्या पुस्तकांच्या वाचनाने माझ्या कामवासना उद्दीपित झाल्या नाहींत. याला कारण मी एक मेडिकल स्टूडंट असल्याने या प्रश्नाकडे शास्त्रीय दृष्टिकोनाने पहात असेन हें असेल, अगर माझ्या जीवनावर म. गांधींच्या चारित्र्याविषयक लिखाणांची बरीच छाप पडली म्हणून असो. ( व्यक्तिशः गांधीजींना मी चारित्र्यविषयक आदर्श मानीत होतों, परंतु कांही महिन्यांपूर्वी शेगांव येथे प्रत्यक्ष राहून डॉ. वाटवे यांनी गांधींच्या चारित्र्यासंबंधी शंका उत्पन्न होईल असे जे लेख प्रसिद्ध केले आहेत, त्यांना गांधींनी अगर त्यांच्या एकनिष्ठ महाराष्ट्रीय अनुयायांनी कांहीच समर्पक उत्तर दिलें नसल्याने शंका दृढ झाली व प्रसाददीक्षेतील स्वतः गांधींच्या स्वलिखित पत्रांनी गांधींचें खरें स्वरूप बाहेर पडून खात्रीच झाल्याने हा व्यक्तिगत आदर्श हीन ठरला. तरी त्यांनी आपल्या लिखाणांनी जो काल्पनिक आदर्श उत्पन्न केला आहे त्याची छाप अद्याप मजवर आहे ). प्रो. फडके यांच्या कांही कादंबऱ्या वाचतांना कामोद्दीपन होतें हें खरें, पण आपल्या शास्त्रीय लिखाणांनी अगर पृष्ठावरील नग्न चित्रांनी तें होतेंच असें नाही. मनुष्य जसा सुसंस्कृत असेल त्या मानाने त्याचें कामोद्दीपन अवलंबून असतें. यास्तव आपल्या मासिकाला दोष देणारे ( अश्लील, कामोद्दीपक म्हणून ) स्वतःच कोणत्या दर्जाचे आहेत हें सिद्ध होतें.

कामवासना प्रत्येक प्राणिमात्राला आहेत व निरोगी अवस्थेत त्या समाजमान्य मार्गानें मिळवण्याचा हक्क प्रत्येकाला आहे हें मला मान्य आहे. परंतु त्यासाठी स्वैरसमागमाचा पुरस्कार कशासाठी? आपल्या लिखाणांत आपण कुमारिकांना ( प्रौढ ), विवाहितांना व कुमार, विवाहित व विधुर, या सर्वांसाठी स्वैरसमागमाचा पुरस्कार करतां आहांत. एकीकडे आपण विवाहाची आवश्यकता कबूल करतां, ( पृ. २७७ मार्च ३७, 'वधूवरांनी एकमेकांची निवड करावी असें आमचें मत आहे' ) तर दुसरीकडे हे विवाह क्षणभर टिकणें शक्य नाही अशा स्वैरसमागमाचा प्रचार करीत आहांत याचें आश्चर्य वाटतें. विवाह आपल्या कल्पनेप्रमाणें वधूवरांनी आपल्या पसंतीनें केलेला आहे. व हल्ली हा प्रघात सुशिक्षित समाजाला मान्य होत आहे, अशा वेळीं एकमेकांचें एकमेकांवर प्रेम असणारच. मग स्वैरसमागम कशाला? खऱ्या प्रेमाचें महत्व आपण कबूल करतां ( जून ३१ पृ. २८४ वर खरें प्रेम कसें असतें या विषयी दिलेल्या उदाहरणांतील १ व ३ हीं पहा) तर दुसरीकडे मनुष्यमात्र समागमासाठी वैचित्र्यप्रिय आहे असा सिद्धांत मांडतां. आपण क्षणभर दोन्हीहि गोष्टी थोड्याफार प्रमाणांत प्रत्येक मनुष्यांत आहेत असें गृहीत धरूं व मग समाजहिताचे दृष्टीने त्या व्यक्तीनें कोणती गोष्ट करावी हें ठरवूं. वैचित्र्यासाठी स्वैरसमागम करावा म्हटलें तर त्यांत रोगांची भीति व स्त्रियांचे बाबतींत संततीची भीति, आणि सर्वांचे बाबतींत लोकांच्या निदर्शनास न येऊं देण्याची भीति. यांपैकी रोग व संतति यांचे प्रतिबंधक उपाय उपलब्ध आहेत, परंतु ते १०० टक्के खात्रीशीर आहेत असें कोणीहि छातीला हात लावून सांगतो काय? म्हणजे तें पतकरूनहि त्यांत धोकाच आहे, आणि समाजाच्या प्रखर टीकेला तोंड देण्याइतकें, किंबहुना समाज ज्याला आज चारित्र्य समजत आहे, त्या चारित्र्यविहीन गोष्टी करण्याइतकें, मनोधैर्य दाखवणें शक्य आहे काय? चोरून लपून आज खेड्यापाड्यांत व शहरांतील सुशिक्षितांतहि स्वैराचाराची वृत्ति आहे हें मी पाहिल्यावरून कबूल करतों. पण हें चांगलें ( समाजोत्कर्षक ) आहे काय? स्वैरसमागमाची संतति कोणीं सांभाळायची? स्वैरसमागम समान दर्जाच्या

लोकांत होईल असें म्हणतां ( ३१ सप्टेंबरच्या अंकांत पृ. ५५ वर स्वैरसमागमाने रक्तसंकर होतो याला उत्तर देतांना, 'व्यभिचार बहुधा नवऱ्याच्याच दर्जाच्या पुरुषांशी होतो व तो पुरुषहि तिचा नवरा होणें शक्य झालें असतें' ) परंतु असें घडतेंच असें मात्र नाही. सुशिक्षित पुरुषांना समाजांत सर्वत्र वावरतां येतें, तरी त्यांचा संबंध आपल्या दर्जाच्याच स्त्रियांशीं येतो असें नव्हे ( मे ३१, पान २६३ वर एका मोलकरणीशीं संबंध असल्याचें उदाहरण आपणच दिलेलें आहे ) व स्त्रियाहि आर्थिक दृष्टीने स्वतंत्र नसल्याने त्यांना घराबाहेर फारसें पडतां येत नाही व त्यामुळे शेजारीपाजारी व नोकरचाकर यांचेशीं संबंध येणार व यांतूनच समागम घडणार. तेव्हा हे सर्व आपल्या दर्जाचे थोडे असणार ? व कांही गुण आनुवंशिक असतात हें आपणहि कबूल करतां. अशा वेळीं अशा समागमाला संमति देणें, पुरस्कार करणें, म्हणजे समाजांत वाईट संततीची वाढ करणें, व हा सामाजिक गुन्हा आहे. पसंतीने झालेला विवाह पुढें सुखावह होत नाही असें आढळून आलें तर त्यासाठी 'घटस्फोट' करावा ( मुसलमान व ख्रिस्ती लोकांत तो रूढ आहेच ). हिंदुसमाजाला तसा कायदा घडवून आणण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावा, व पुन्हा 'नवी विटी नवें राज्य' सुरू करावें. आपण जगांत वावरतों, तेथे आपले अनेक मित्र असतात. मित्रांमित्रांतील व्यवहार परस्पर विश्वासाने चालतात तोंपर्यंत मैत्री टिकते व जेथे विश्वासघात होतो तेथे आपण असल्या मित्रांपासून चार हात दूर राहतों, किंबहुना त्यांचें तोंड सुद्धां पाहूं इच्छित नाही. असें असतां, व स्वखुषीने बनलेलीं पतिपत्नी हीं एकमेकांचीं त्याहिपेक्षा निकटचीं मित्रमैत्रीण असतांना, व आपल्या म्हणण्याप्रमाणे जरी केवळ समागमासाठी तीं एकत्र येतात-विवाह करतात-हें गृहीत धरलें तरी त्या समागमाचे बाबतींत त्यांनी एकमेकांशीं विश्वासघात कां करावा ? पसंत नसल्यास दूर व्हावें. रशियांत देखील विवाहसंस्था आहेच की नाही ?

—आपल्या कल्पनेप्रमाणे विवाहसंस्था असो किंवा नसो, स्वैरसमागम मान्य केला तर कुटुंबसंस्था टिकणार नाही, सुप्रजा निर्माण होणार

नाहीं. आधींच बेकार असलेल्या देशांत आणखी बेकारी वाढेल व तीहि कुचकामी. यापेक्षा सगळ्यांना जगण्याचा, स्वविकासाचा–शिक्षण व प्रजोत्पादन–हक्क आहे. त्या हक्काला ज्यांच्या कारवाईने प्रतिबंध येत आहे, त्यांचीं कारस्थानें आपण लोकांना समजावून सांगावींत, त्यांतून मुक्तता होण्याचा मार्ग दाखवावा, त्यासाठी ध्येयवान तरुणतरुणी निर्माण होतील अशी दक्षता घ्यावी. हें कार्य आपल्या स्वैरसमागमप्रचाराने होईल असें वाटतें काय? गरीब अशिक्षित समाज अगोदर अज्ञानांत, तो भरमसाट प्रजा निर्माण करून समाजावर भार वाढवीत आहे. श्रीमंतांना स्वतःच्या विलासापुढे कांही सुचत नाहीं. राहतां राहिला मध्यमवर्ग. आज हा वर्ग जीवनकलहाच्या वणव्यांत होरपळून निघत असतांना देखील समाजोन्नतीचा झेंडा हातीं घेऊन त्यासाठी आपलें सर्वस्व खर्च करीत आहे. जगांतील राजकीय व सामाजिक क्रांत्यांचें पुढारीपण याच मध्यमवर्गाने घेऊन त्यांत यश मिळवलें आहे, असा इतिहास असतांना आज याच मध्यमवर्गांतलि तरुणांपुढे आपण स्वैरसमागमाचा प्रचार करीत बसावें याचें आश्चर्य वाटतें. आपल्या मासिकाचे वाचक याच वर्गांतील आहेत हें खास. आपल्या संततिनियमनाच्या प्रचाराला बहुतेक समंजस लोकांची मान्यताच आहे. किंबहुना संततिनियमनाचा प्रसार खेड्यापाड्यांत जितका लवकर होईल तितका चांगला. मला वाटतें गांधी खादीच्या मागें जे श्रम घेतात, त्याऐवजीं जर संततिनियमनासाठी घेतील तर खरोखरीच बेकारीचा प्रश्न सुटेल व राष्ट्राला चांगली अवस्था प्राप्त होईल. गांधी म्हणतात त्याप्रमाणे ब्रह्मचर्य अशक्य आहे, याला त्यांचें स्वतःचें उदाहरण आहेच. परंतु त्यांचे सत्याचे प्रयोग करीत असलेला आश्रम, तेथील भानगडी, त्यांसाठी केलेले अनेक उपवास, नीला नागिणी प्रकरण, शिवाय सत्याग्रहाचे वेळीं तुरुंगांत स्वसंभोग व समसंभोग मोठमोठे पुढारी सुद्धां करीत असत हें ज्यांना माहीत आहे त्यांना तरी ब्रह्मचर्य पाळणें सोपें वाटणार नाहीं.

यापेक्षा वधूवरसंमत विवाह करून आवश्यक तेवढी संतति झाली की संततिनियमन **कृत्रिम मार्गाने** करावें, म्हणजे व्यक्तिगत विकास होईल, समा-

ज्याचा प्रश्न सोडवण्यास आपल्या शक्तीप्रमाणें मदत करतां येईल. उलट आज मध्यमवर्गांत जी सुशिक्षित तरुणतरुणींची बेकारी वाढली आहे, तिला जर योग्य मार्गदर्शक मिळाला नाही, केवळ कामवासनेच्याच आहारीं ही मंडळी पडली, तर समाजाचा तो मोठा ऱ्हास होणार आहे व त्याचीं हीं पूर्वचिन्हें आहेत. आपल्या स्वैरसमागमाच्या प्रचाराने त्याला मदतच होत आहे. आपण विचारी आहांत, समाजहिताची आपल्याला कळकळ आहे, त्यासाठी आपण स्वार्थत्याग केलेला आहे, तेव्हा आपल्याच ध्येयाकडे जाणारा आपला एक मित्र म्हणून मी आपणास आपलें धोरण बदलण्याची ( स्वैरसमागमाचा पुरस्कार न करण्याची ) विनंति करतों. ती मान्य करणें न करणें आपल्या विवेकबुद्धीवर अवलंबून आहे.

आपल्याला हवा तसा समाज निर्माण करण्याची जबाबदारी सुशिक्षित लोकांवरच आहे असें आपणालाहि वाटतें. रशिया आपल्या डोळ्यांपुढे आहे. तेथील मनुष्याला माणुसकीचे जे हक्क आहेत ते येथील मनुष्याला मिळतील, शक्य तितक्या लवकर मिळतील, असा प्रचार करूं या. आपला **समाजहितेच्छु.**

**उ.** आम्हाला समाजहिताची कळकळ आहे व आम्हीं स्वतःच्या मतांकरतां थोडासा स्वार्थत्याग केला आहे, या गोष्टी ज्या अर्थी आपणच लिहिल्या आहेत, आणि शिवाय ' आपण विचारी आहांत' असेंहि लिहिलें आहे, त्याअर्थी आपल्या पत्राचा एकंदर निष्कर्ष इतकाच निघतो की आम्ही विचारी असलों तरी आम्हाला आपल्याइतका विचार करतां येत नाही, आणि समाजहित कशांत आहे हें आपणास कळतें तसें आम्हाला कळत नाही. स्वतःचीं मतें बरोबर आणि दुसऱ्याचीं चूक, असें सर्वांसच वाटतें, तेव्हा आपणासहि तसेंच वाटलें तर त्यांत मोठेंसें नवल नाही, आणि आपण आम्हाला ' विचारी ' म्हटलें आहे तें केवळ शिष्टाचाराकरतां असावें असें दिसतें. हरकत नाही. तरी पण आपण ज्याअर्थी आमच्या विचारांवर किंवा अविचारांवर कांही आक्षेप घेतले आहेत त्याअर्थी त्यांना उत्तर देणें आमचें कर्तव्य आहे. गांधींच्या लिखाणाचा आपणावर पगडा बसला आहे हें आपण कबूलच केलें आहे आणि गांधींचे विचार धर्मावर व आंतल्या आवाजावर आधारलेले आहेत. त्यांना आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा

र्थहि नाही. समाजहित हा धर्माचा प्रश्न नाही. अर्थात् ज्यांना धर्मच पाहिजे असेल त्यांना समाजहिताशीं करायचें आहे काय? त्यांना मोक्ष मिळाला म्हणजे झालें.

समाजांत अमुक गोष्टी हल्लीं चालू आहेत म्हणून त्या हितकर आहेत असें मानण्याचें कांहीच कारण नाही. जगांत सर्व समाजांच्या नीतिकल्पना सारख्या नाहीत व ज्यांच्या नीतिकल्पना आपल्यापेक्षां वेगळ्या आहेत त्यांचा त्यामुळे ऱ्हास झालेला दिसत नाही. उदाहरणार्थ जपानांत मुलींनी विवाहापूर्वी वेश्यावृत्ति करून पैसे जमवून नंतर लग्न करण्याची पद्धत आहे, पण आपला समाज या चालीला भयंकर समजतो. आपल्या समजुतीने कामवासना हें एक भयंकर व्यसन आहे असें दिसतें. एरवीं 'कामवासनेच्या आहारीं ही मंडळी पडली' याचा अर्थ काय? ही आपली समजूत चुकीची आहे. ती एक नैसर्गिक वासना आहे आणि तिला योग्य वाव दिल्याने कोणतेंहि नुकसान होत नाही, तेव्हा तें व्यसन समजतां येत नाही. अतिरेकाने नुकसान होईल, पण खाण्यांत अतिरेकानेहि नुकसान होईल म्हणून खाणें वाईट ठरत नाही. हें लक्षांत ठेवून यावर वाद केला पाहिजे. समाजाच्या चालू रूढीविरुद्ध फारच थोडे लोक जाऊं शकतात, कारण त्यांत नेहमीच धोका असतो. परंतु चालू रूढींप्रमाणेंच सर्वांनी वागायचें म्हटल्यास कोणतीहि सुधारणा होणें शक्य नाही, आणि आपल्या मतानेहि सुधारणा पाहिजे आहे, कारण आपण घटस्फोट पसंत करतां. समागमाविषयी ज्या विक्षिप्त कल्पना समाजांत रूढ आहेत, त्यांवर आपलें पत्र आधारलेलें आहे. उदा० आपण पतिपत्नींची जर निकट मित्रांशीं तुलना केली आहे, तर आपल्या डोक्यांत हेंहि आलें पाहिजे होतें की कितीहि निकटचा मित्र असला तरी तो दुसऱ्याशीं मैत्री जोडणें हा कधीहि विश्वासघात समजत नाही. तरमग पतिपत्नीचे बाबतींत मात्र तो विश्वासघात कसा होतो? पत्नी ही आपली मालमत्ता आहे ही कल्पना याच्या मुळाशीं आहे. आपल्या समाजांत वैचित्र्याची आवड पुरुषांचे बाबतींत कबूलच केलेली आहे, आणि म्हणूनच त्यांना अनेक बायका करण्यास किंवा

रखेल्या ठेवण्यासहि धर्माची व कायद्याची परवानगी आहे. स्त्रियांस मात्र वैचित्र्याची परवानगी नाही, कारण स्त्री ही पुरुषाची मालमत्ता असते. यांत प्रेमाचा प्रश्नच येत नाही. जेथे प्रेम असेल तेथे आमच्या सांगण्यावरून तें बाजूला ठेवून कोणी केवळ वैचित्र्याकरतां तिसऱ्याशीं समागमास तयार होणार नाही. परंतु प्रेम हें कर्तव्य असूं शकत नाही आणि त्याची कोणावरहि सक्ती करतां येत नाही. ' स्वैरसमागम ' या शब्दाचा वाईटच अर्थ करण्याची लोकांची प्रवृत्ति असते, परंतु आम्ही जो इष्ट समजतों तो सर्वांत उच्च प्रकारचा समागम होय. तो म्हणजे दोन माणसांचा परस्परसंमतीनें समागम. विवाहांत पत्नीवर समागमाची सक्ती असते, हा रानटीपणा आहे. अशा विवाहसंस्थेचा पुरस्कार आम्हीं कधींहि केलेला नाहीं. वधूवरांनी एकमेकांची निवड करावी म्हणणें म्हणजे पुरस्कार नव्हे. कोणी जीव द्यायचा निश्चय केल्यास त्याला अमुक मार्गाने जीव दिल्यास त्रास कमी होईल असें सांगणें, हा आत्महत्येचा पुरस्कार नव्हे. विवाहसंस्था आज अस्तित्वांत आहे, ती आमचे प्रचारानें उद्यां नाहीशी होईल हें शक्य नाही.

अनिष्ट संततीची भीति फोल आहे, कारण विवाहसंस्था तरी इष्ट संततीची खात्री करण्याच्या दृष्टीने कोठे केलेली आहे ! संतति चांगली पाहिजे असेल तर पुरुष व स्त्री दोन्ही सुदृढ प्रकृतीचीं पाहिजेत, पण विवाहांत तशी कांहीच व्यवस्था नसते. विवाहांत दोन्ही माणसें मरतुकडीं किंवा एक मरतुकडें असलें तरी चालतेंच, आणि त्यांना संतति निर्माण करण्याची पूर्ण मुभा असते. तीच गत रोगांची. विवाहित लोकांना रोग होत नाहीत असें थोडेंच आहे ? गुप्त रोग झालेल्या स्त्रियांत निम्म्या विवाहित असतात, वेश्यांचें निमे गिऱ्हाईक विवाहित पुरुष असतात. तेव्हा रोग कसे टळणार ? तो विवाहसंस्थेचा उद्देशच नाही. विवाह ही धार्मिक बाब आहे. भटांच्या मंत्रांशिवाय समागम हें पाप होतें, ही कल्पना त्याच्या मुळाशीं आहे. त्यांत आरोग्याचा संबंध नाहीं. आनुवंशिक गुणांविषयी म्हणाल तरी तेंच. विवाह जुळवतांना कधी कोण अनुवांशिक गुण पाहतो ? थैलीपलीकडे कोणी फारसा विचार करीत नाहीं. स्त्रियांचा

किंवा पुरुषांचा पुष्कळ वेळां नोकरांशीं समागम होतो हें खरें, पण तो कां ? त्यांना वैचित्र्याची हौस चोरून भागवावी लागते म्हणून. एरवीं सामान्यतः मनुष्य आपल्याच दर्जाच्या माणसांची निवड करील. अर्थात् विशेष सौंदर्य असल्यास तो दर्जाकडे लक्ष देणार नाही, पण त्याला इलाज नाही. संततीचा व रोगांचाही प्रतिबंध करतां येतो. तो १०० टक्के यशस्वी नसला तरी ९९ टक्के आहे. शंभरांत एकदां फसलें तर किती नुकसान होईल ? हल्ली जें चालू आहे त्यांत यापेक्षांहि जास्त नुकसान होत आहे, कारण अजून प्रतिबंधाचे मार्ग सर्वांस माहीत नाहीत. वेडगळ, धार्मिक, गांधीछाप समजुती बाजूला ठेवल्या की हें कबूल करणें भाग आहे की अन्नांत जसें वैचित्र्य उत्तम मानतात तसेंच यांतहि मानलें पाहिजे. आणि हा केवळ मानण्याचा प्रश्न नाहीं. ज्यांना वैचित्र्याचा अनुभव मिळतो, त्यांची प्रकृति उत्तम राहते असा अनुभव आहे. वैचित्र्य म्हणजे अतिरेक मात्र नव्हे. एकपत्नीव्रताने राहणारा मनुष्यहि अतिरेक करूं शकतो. वैचित्र्याचा व अतिरेकाचा बिलकूल संबंध नाही. धार्मिक कल्पना धार्मिक लोकांनी खुशाल पाळाव्या, त्या दुसऱ्यावर लादण्याचा त्यांना काय हक्क ? समाजाला लोक नेहमीच भितात, म्हणून काय रूढीविरुद्ध कल्पनाच मांडूं नये ? मग आपण तरी घटस्फोटाचा पुरस्कार कसा करतां ?

यांत बेकारीचा काय संबंध ? कांहीतरी नांवें ठेवायचीं म्हणून ठेवायचीं ? कांहीही वाईट झालें की तें ब्रिटिश सरकारामुळे असें म्हणणाऱ्या देशभक्तां-सारखेंच आपण करतां. रशियांत जें जें होईल तें तें चांगलें म्हणणारा मी नाही, तेव्हा रशियांत विवाह आहे म्हणून तो इष्ट ठरत नाही. मनुष्यप्राण्यांनी एकमेकांवर मालकीहक्क सांगणें ही गुलामगिरी आहे. वेश्यांना जें स्वातंत्र्य असतें तें देखील विवाहित स्त्रियांना नसतें. त्यांच्यावर समागमाची सक्ती असते, कायद्याने सक्ती असते, आणि ही पद्धत आपल्याला पसंत आहे. आम्हास ती पसंत नाही. सं.

---

# शारदेचें पत्र

**चित्राचा** हा कोण अडाणी लेखक आहे कोणाला माहीत, स्वतः दारूबाज असल्याशिवाय देखील कोणी दारूबंदीला विरोध करूं शकेल हें कांहीं त्याच्या मठ्ठ डोक्यांत शिरत नाही. मला दारूचा 'परमिट्' द्यावा म्हणून त्याने शिफारस केली आहे. अक्कल कोणाला शिकवून थोडीच येणार आहे ? त्याच्या शिफारशीने परमिट् मिळणार नाही हेंहि त्याला समजत नाही.

दारूबंदीच्या वेळीं, मजुरांचे सर्व पैसे दारूंत जातात म्हणून ना. मुनशींना त्यांचा मोठा पुळका आला होता, आणि त्यांचे पैसे वांचवण्याकरतां ते इतरांना अन्याय करायला तयार झाले. पण परवां एकानें धार्मिक विधींत होणाऱ्या फाजील खर्चाला आळा घालण्याकरतां एक सूचना आणली, तेव्हा मात्र मुनशी आडवे पडले. त्यांत कोणाचेंच नुकसान नव्हतें, सर्वांचाच फायदा होता, तरी त्यांना तें पटलें नाही. या वेळीं ही धार्मिक बाब असल्यामुळें बहुधा **आंतल्या आवाजाकडून** कांही फर्मान आला नसावा. काँग्रेस मंत्री म्हणजे हुकुमाचे ताबेदार, फर्मानच आला नाही तर ते तरी काय करणार ?

पदवीधर म्हणजे प्रवीण, अशी **प्रावीण्याच्या** संपादकांची कल्पना दिसते, पण त्यानीं ऑक्टोबरच्या अंकांत खांडेकरांच्या नवीन बोलपटाचें जें परीक्षण एका पदवीधराकडून लिहवलें आहे त्यावरून तसें बिलकुल दिसत नाहीं. या गृहस्थांना खांडेकरांचें कथानक मात्र उत्तम वाटतें, पण त्याचें दिग्दर्शन मात्र अळतेकरांना करतां आलें नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. माझें मत याच्या बरोबर उलट आहे, पण लेखकाचें मत भिन्न असलें तरी त्याचें समर्थन तर करतां आलें पाहिजे ? तें समर्थन तर बाजूलाच राहिलें, पण त्यांच्या वर्णनावरूनच दिग्दर्शन अतिशय उत्तम झालें आहे असें म्हणावें लागतें. दिग्दर्शकाने काय करायचें असतें, याचीच या पदवीधराला नीटशी कल्पना दिसत नाही. ते म्हणतात 'प्रत्येक पात्राने आपापल्या भूमिका सहजसुंदर केल्या आहेत. त्यांतल्या त्यांत उषेची चंचलेची भूमिका जास्त उत्तम वठली आहे. सरदेसाई यांनी माणिकची भूमिका समजून केली असून त्यांनी सौंगडीमध्यें उत्तम काम करून मिळवलेलें श्रेय कायम राखलें आहे. मीनाक्षी

प्रथमतःच अभिनय करतांना दिसल्या. ' हा सर्व कशाचा परिणाम आहे हें या लेखकाच्या डोक्यांत आलेलें दिसत नाही. विमल सरदेसाई यांच्या सौंगडींतील कामाचें श्रेय सर्वस्वी अळतेकरांचें होतें आणि नव्या नटीला इतकें चांगलें काम एरवीं करतां आलेंच नसतें. येथेहि अळतेकरच दिग्दर्शक होते. मीनाक्षीनें प्रथमच चांगलें काम केलें असें हा लेखक कबूल करतो, पण त्याचें श्रेय मात्र दिग्दर्शकाला देण्याची तयारी नाही. मीनाक्षीच्या अंगच्या गुणांनी जर हें काम चांगलें झालें असले, तर आजपर्यंत ते गुण कोठे गेले होते ? मास्टर विनायक हे उत्तम दिग्दर्शक, आणि त्यांचे मानाने अळतेकरांचें तेज पडत नाही, असें ठरवण्याचा बेत करून हा लेख लिहिलेला दिसतो, तरीपण याच लेखांतून खरें बाहेर पडत आहे. बरें, कथानक अतिशय चांगलें आहे अशी अगोदर स्तुति केल्यानंतर ' प्रेमभंग व आशाभंग झाल्याबरोबर दारू व वेश्या यांशिवाय दुसरा उपायच मनःशांतीकरतां नाही असाच जणूं प्रत्येक लेखकाचा कयास असतो, आणि खांडेकरांनी त्याचाच अवलंब केला आहे. त्याचप्रमाणे बोर्डिंगमधून रात्रीं १० वाजतां धांवत रस्त्यावर येऊन उषा एकटीच त्या ठिकाणीं लेखकाच्या कृपेमुळे भेटलेल्या आनंदाशीं गप्पा मारीत बसते, असे न पटणारे प्रसंग कथानकांत आहेत. सबंध चित्रपटांतून दिसणारें गंभीर व दुःखी वातावरण-अवास्तववादी वाटतें.' याचा अर्थ काय ? मग कथानक सुंदर आहे असें प्रथम म्हटलें ते कसें ? दारू आणि वेश्या यांचा उपयोग पुरुषांना दुःख विसरण्याकरतां होतो, ही वस्तुस्थिति आहे, केवळ लेखकाची कल्पना नव्हे. तेव्हा त्याबद्दल मी खांडेकरांना मुळीच दोष देत नाही. प्रस्तुत लेखकाच्या विसंगतीची मला गंमत वाटते. खांडेकरांची स्तुति ही केलीच पाहिजे, तेव्हा कथानक उत्तम आहे म्हणून एकदां सांगून टाकल्यावर, ' कथानकाची मांडणी श्री. खांडेकरांना अजून जमत नाही. सबंध कथानक एकच कथा न वाटतां निरनिराळे प्रसंग एकत्र करून तयार केल्यासारखें वाटतें...... त्या कारणाने चित्रपटाच्या सूत्रबद्धतेला बाध येऊन पुन्हां रसभंगहि होतो, तरी कथानक चांगलेंच'. माझ्या मताने या कथानकांत अनेक दोष आहेत आणि

दिग्दर्शनच सर्वांत उत्कृष्ट आहे. कोठकोठे कातरी लावायला पाहिजे होती असें वाटतें इतकेंच, पण हा दोष बहुतेक सर्व हिंदी बोलपटांत आणि कधीकधी अमेरिकन पटांतहि दिसतो. पण विशेषतः मीनाक्षीच्या पूर्वीच्या कामांवरून तिला इतकें चांगलें काम करतां येईल असें कोणालाहि वाटलें नसतें. तें अळते-करांनी करून दाखवलें. तिला रूप नसतांहि तिच्या अभिनयामुळे तो कमीपणा या बोलपटांत भासत नाही. कथानक पहावें तर माणिक हें पात्र स्वाभाविक दिसत नाही. बी. ए. झालेल्या मुलीहि लग्न करतांना चुका करतात अशीं कांही उदाहरणें मामा वरेरकरांनीं दिली आहेत. पण त्या चुकांच्या मुळाशीं कांहीं तशींच कारणें असतात. तीं कारणें समजलीं तर त्या चुका क्षम्य वाटतात. तशीं कारणें येथे दिसत नाहीत. एका माणसावर प्रेम असतांना ती भलत्याशीं लग्न करते, त्याच्या पैशाच्या जोरावर समाजकार्य करूं पाहते, त्याने खांद्यावर हात ठेवला असतां त्याला झिडकारते आणि ‘ प्रेमच करायचें असतें तर मीं श्रीमंताची मागणी झिडकारली नसती ’ असें उत्तर देते. जणूं काय प्रेमाला श्रीमंतीची जरूर असते ! इतकें सामान्य सौजन्य देखील जिच्या अंगीं नाही, आणि प्रेमांत कांही अर्थ नाही असें तत्वज्ञान जी नवऱ्याला सांगते, ती शेवटीं प्रेमांतच फसते, आणि विष खाऊन नवऱ्याच्या पायांशीं मरायला येते. हा नवरा तर इतका नेभळट आहे की त्याच्या मनांत प्रथमपासूनच उषेबद्दल प्रेम असतां तो तें एका शब्दाने देखील व्यक्त न करतां इतरांनी निवडलेली बी. ए. वधू पसंत करतो आणि तिच्याजवळ प्रेमाची याचना करतो. पुरुषांच्या प्रेमाला पुष्कळ फाटे असतात असें धरून चाललें, तरी यामुळे आनंदबद्दल सहानुभूति कमी होते. जी येईल तिच्याशीं हा आपला प्रेम करायला तयार ! उषेवर त्याचें प्रेम आहे असें दाखवलें आहे, माणिकशीं तो प्रेमयाचना करतो, चंचलेला तो प्रथम झिडकारतो, पण शेवटीं तिच्यावरहि प्रेम करतो, निदान तशी कृति करतो. चंचलेचें पात्रहि मनाला पटत नाही. वेश्या म्हणजे हलकटच असल्या पाहिजेत असेंहि एक वेळ धरून चाललें तरी हें पात्र मानवी स्वभावाला धरून नाही असें म्हणावें लागतें. आनंद खूप श्रीमंत असता, आणि तिने त्याच्याकडून पैसा

काढण्याकरतां त्याला जाळ्यांत पकडला असता, तर त्याच्याकडून आणखी कांही मिळण्याचा संभव नाही असें दिसल्याबरोबर त्याला हांकून देणें योग्य म्हटलें असतें. पण आनंदाचे बाबतींत तिची अशी वागणूक नव्हती. आनंदाला तिने जो अनेक युक्त्या करून वश करून घेतला, तो पैशाच्या आशेने नव्हे, तर तिचें त्याच्यावर एक प्रकारचें प्रेम होतें म्हणूनच. अशा परिस्थितींत ती नंतर त्याला इतक्या निष्ठुरपणें वागवते, आणि तें केवळ तो दारू पितो म्हणून, हें असंभाव्य आहे आणि स्त्रीहृदयाची पारख खांडेकरांना नाही असेंच यावरून म्हणावें लागतें. वेश्यांनाही स्त्रीचें हृदय असतें, हें पुष्कळ लेखकांना समजत नाही, याचें कारण वेश्या म्हणजे हलकट असें ते पुस्तकांतून शिकतात. एकंदरींत हा बोलपट पाहण्यासारखा झाला असेल तर तो दिग्दर्शनामुळेंच, कथानकामुळे नव्हे.

प्रभातचा 'माणूस' मी अजून पाहिला नाही. पण त्यावरची टीका वाचून त्या लेखकालाहि वेश्यांचा स्वभाव कळला आहे असें दिसत नाही. वेश्या स्वतःला पापी समजतात ही कल्पना कांही नीतिबाज लोकांनी पसरलेली आहे, पण त्यांत विशेष तथ्य नाही. सोंवळ्या समाजांतली स्त्री जर फसून या धंद्यांत पडली तर कदाचित् तिला तसें वाटण्याचा संभव असतो, परंतु सामान्यतः वेश्या आपला धंदा सोडून लग्न करायला तयार असतात ही कल्पना खोटी आहे असें नीतिबाज लोकांना पुष्कळ वेळां आढळतें, मग ते तसें कबूल करोत की न करोत. पण बोलपट पाहीपर्यंत मी त्यासंबंधी जास्त लिहीत नाही.

तुझी **शारदा**

---

**वाईचे १०८ सत्यनारायण.** वाई येथील आमचे एजंट व लोकमान्य सेंट फॅक्टरीचे मालक श्री. राजाभाऊ बनारसवाले यांनी एक हस्तपत्रक काढून वाई येथे करूं घातलेल्या १०८ सत्यनारायणांच्या चालकांची हजेरी घेतली आहे. सत्यनारायण अवतारासाठीं होणार आहेत अशी थाप देऊन, सोहाळयाच्या कार्यकारी मंडळांत एक शिंपी व एक मराठा यांना घेतले असले तरी त्यांना पूजेस न बसवतां यजमान म्हणून १०८ ब्राह्मणांचीच वर्णी लागली. यासंबंधी दिनकरराव

जवळकरांनी ब्राह्मणवर्गाला उद्देशून सवाल केला होता की ज्या देवाला पाणी घाल-ण्याची ब्राह्मणेतरांना मुभा नाही, त्या देवावर यवनांनी हल्ला केल्यास ब्राह्मणेतरांनी कां धांवून यावें व आपले रक्त सांडावें ? हा जातिभेद नाहींसा केला पाहिजे. असा त्याचा थोडक्यांत सारांश आहे. आम्हास यांत इतकेंच सुचवायचें आहे की ब्राह्मण जसे ब्राह्मणेतरांना दूर लोटतात, तसेच ब्राह्मणेतर अस्पृश्य समजलेल्या जातींना दूर लोटतात. तेव्हा ब्राह्मणांप्रमाणेंच ब्राह्मणेतरांनाहि हा आपला दोष काढून टाकावा, म्हणजे त्यांच्या बाजूला अधिक जोर येईल. **संपादक.**

**'बॉंबे टॉकीज' चा 'कंगन'.** कथानक, चित्रीकरण, संगीत वगैरे सर्व दृष्टींनी हा बोलपट सुंदर झाला आहे. लीला चिटणीसचें काम अलीकडे अधिकाधिक आकर्षक होऊं लागलें आहे आणि त्यांचें स्वरूपहि हल्ली सुधारलें आहे. यांत फोटोग्रॅफरचें कौशल्य तर आहेच, पण त्यांचा स्वतः चा प्रयत्नहि आहे यांत शंका नाही. दिग्दर्शनांत कांही किरकोळ चुका दाखवतां येतील, पण तेंहि सामान्यतः चांगलें आहे. सरोज बोरकरच्या गायनाचा अधिक उपयोग करतां आला असता तर बरें होतें. तिचा आवाज गोड आहे, पण तिला पुरेसें गाणें नाही. बोलपट रसिकांनी अवश्य पाहण्याजोगा आहे.

---

# गृहकर्मे

( या सदरांत येणारी उपयुक्त माहिती कोणीं पाठवल्यास छापूं. **सं.** )

**टमाटोचा मुरंबा.** सामग्री :--एक रत्तल पक्के मोठे लाल टमाटो, एक रत्तल साखर, एका मोठ्या आंबट लिंबाचा रस, अर्धा इंच आल्याच्या चाक्या.

**कृति.** प्रथम टमाटो स्वच्छ धुवून त्यांच्या चार किंवा आठ फोडी कराव्या. नंतर साखरेचा पक्का पाक करून त्यांत टमाटो व आल्याच्या चाक्या टाकाव्या. टमाटोंतलें पाणी सुकून रस जाड झाला की त्यांत लिंबाचा रस घालून एक दोन उकळ्या आल्या की चुलीवरून उतरावें.

**सौ. मालिनी दीनानाथ जयकर**

**आमचा खटला :** २१ आक्टोबर रोजीं न निघतां पुनः १७ नव्हेंबर पर्यंत ढकलला आहे.